**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०४/२०२४,**
**मंजुषा वि. प्रणिता**

**निशाणी ०१ च्या खालीतक्रारकर्ता पक्षासाठी साक्षीदार क्र. १**
**(फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २०० प्रमाणे)**

तक्रारकर्ता पक्षासाठी साक्षीदार क्र. १
(फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २०० प्रमाणे)

**मी शपथपूर्वक आणि सत्यप्रतिज्ञेवर निवेदन करते कीः**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | - | **मंजुषा अजित खैरे,** |
| माझे वय | - | ४० वर्षे |
| व्यवसाय | - | गृहिणी |
| पत्ता | - | आलापल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली. |

१. मी आणि आरोपी क्र.१ बचत गटात काम करत होतो. सन २०१५ ते २०२० पर्यंत आम्ही सोबत काम केले. त्यानंतर २०२० मध्ये आमचे बचत गटाचा हिशोब सर्व महिलांच्या संमत्तीने झाला होता. त्यावेळी आरोपी क्र.१ च्या घरी काही तरी प्रॉब्लेम होता. त्यामुळे ती हिशोबाच्या वेळी आली नाही. सन २०२४ मध्ये ती अचानक आली व बचत गटाचा हिशोब पुन्हा कर असे म्हणाली नाही तर मला पैस तरी दे, असे म्हणुन ती म्हणाली की, तु माझे मुलाला नोकरी लावण्यासाठी पैसे घेतले होते असा आरोप केला व ते पैसे परत दे असे म्हणाली. त्यावेळी आरोपी क्र.१ आरोपी क्र.२ सोबत आली होती. तसेच त्यांच्यासोबत अजुन दोन लोक होते व मला जिवे मारण्याची धमकी दोघे नवरा बायकोने दिली. याव्यतिरिक्त मला काहीही सांगायचे नाही.

**दिनांक २८.०५.२०२४**

स्वा./-
**तक्रारकर्ता**

**समक्ष**

SAJIDUZZAMAN SHAHID

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2024.05.28 16:26:46 +0530

**[एस.एम.एच. शाहिद]**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी.**